# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.02.2026** **वार:रविवार**

**ठळक बातम्या,**

**१. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी घेतली राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.**

**२. कर्तव्यभावनेनं जबाबदारी स्वीकारत असल्याचं सुनेत्रा पवार यांचं निवेदन.**

**३. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रिय अर्थसंकल्प सादर करणार.**

**४. वकीलांसाठीच्या देशातल्या पहिल्या प्रशिक्षण आणि संशोधन केंद्राचं लोकार्पण.**

**५. नमामी मुळा-मुठा योजना आखून नदी सुधार प्रकल्पाअंतर्गत प्रदूषणावर ठोस उपाययोजना करणार असल्याची केंद्रिय जलशक्ती राज्यमंत्र्यांनी दिली माहिती**

**आणि**

**६. न्यूझीलंडविरुद्धची वीस षटकांची क्रिकेट मालिका भारताने 4-1 अशी जिंकली.**

**आता सविस्तर बातम्या,**

**सुनेत्रापवार**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी काल राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मुंबईत लोकभवन इथं झालेल्या छोटेखानी समारंभात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच राज्य मंत्रीमंडळातले मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधीमंडळ नेतेपदी काल सुनेत्रा पवार यांची एकमतानं निवड करण्यात आली. पक्षाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला आणि छगन भुजबळ यांनी त्याला दुजोरा दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्याबद्दल सुनेत्रा पवार यांचं अभिनंदन केलं आहे. सुनेत्रा पवार लोककल्याणासाठी काम करतील आणि अजित पवार यांचं स्वप्न पूर्ण करतील असा विश्वास पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशातून व्यक्त केला आहे.

केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनीही समाज माध्यमावरील संदेशातून सुनेत्रा पवार यांना शुभेच्छा दिल्या आहेत. राज्याचे हित लक्षात घेऊन अतिशय कठीण परिस्थितीतही सुनेत्राताई खंबीरपणे जबाबदारी स्वीकारत आहेत हे कौतुकास्पद आहे असं गडकरी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, सरकारकडे एवढं बहुमत असताना शपथविधीची अशाप्रकारची घाई अनाकलनीय असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. तर राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यासारखं उपमुख्यमंत्री हे घटनात्मक पद नसताना एवढ्या घाईत शपथविधी का झाला हे राष्ट्रवादी काँग्रेसच सांगू शकते असं काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले.

**सुनेत्रापवार प्रतिक्रिया**

अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना 'शिव–शाहू–फुले–आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत आहे असं सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. अजितदादांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन, हा विश्वास मी आज या निमित्ताने देते असं त्यांनी या निवेदनात नमूद केलं आहे. या कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेनं दिलेलं प्रेम, विश्वास आणि पाठिंबा हेच आपलं सर्वात मोठं बळ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**अर्थसंकल्प**

केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज लोकसभेत 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रिय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. यात विकास, रोजगार निर्मिती आणि आर्थिक स्थैर्य यावर भर देत आगामी आर्थिक वर्षातलं महसूल संकलन आणि खर्च याबाबतचा आराखडा त्या सादर करतील. सीतारामन यांनी सादर केलेला हा सलग नववा अर्थसंकल्प असेल. अर्थसंकल्प तयार करण्याआधी सीतारामन यांनी तज्ज्ञांसह व्यापार संघटना, शिक्षण, आरोग्य, एमएसएमई, सेवा, भांडवली बाजार इत्यादी क्षेत्रांच्या प्रतिनिधींसोबत चर्चा केली. कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनीदेखील कृषी क्षेत्राशी तसंच ग्रामीण विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करून त्याबाबतचा अहवाल सीतारामन यांच्याकडे सुपूर्द केला.

**<u>मुख्यमंत्री</u>**

बदलते कायदे, नवीन फौजदारी कायदे, तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षित वकील आणि अभियोजक तयार करणं आवश्यक असल्याचं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्यावतीनं स्थापन करण्यात आलेल्या वकीलांसाठीच्या देशातल्या पहिल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण आणि संशोधन केंद्राचं लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालं, त्यावेळी ते बोलत होते. कायद्याचं शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज यातील दरी भरून काढण्यासाठी ही अकॅडमी अत्यंत महत्त्वाची ठरेल असं मुख्यमंत्री म्हणाले. माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते या अकादमीचं उद्घाटन करण्यात आलं. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अकादमीच्या इमारतीचं दर्जेदार आणि अल्पावधीत पूर्ण झालेलं बांधकाम दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीची आठवण करून देणारं असल्याचं सांगून त्यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**<u>या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.</u>**

**<u>मुळामुठा</u>**

पुण्याची जीवनवाहिनी असणाऱ्या मुळामुठा नदीतील प्रदूषण ही गंभीर समस्या आहे. नमामी गंगा चळवळीप्रमाणे नमामी मुळा-मुठा योजना आखून नदी सुधार प्रकल्पाअंतर्गत ठोस उपाययोजना करणार असल्याची माहिती केंद्रिय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी दिली. ते काल पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढवणं, अवैध सांडपाणी जोडण्या तोडणं, औद्योगिक घटकांकडून होणाऱ्या प्रदूषणावर कठोर कारवाई करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं. नदीचं संवर्धन ही सरकारीबरोबरच स्थानिक नागरिकांचीदेखील सामुहिक जबाबदारी आहे, असं चौधरी म्हणाले.

**<u>उद्घाटन</u>**

नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर इथल्या प्रशासकीय इमारतीचं आणि दर्शन रांग मंडपाचं उद्घाटन काल केंद्रिय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांच्या हस्ते झालं. आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगानं नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं सुरू असलेले प्रकल्प लवकर पूर्ण केले जातील असं सांगून या प्रकल्पांमुळे भाविकांना आणि पर्यटकांना उत्तम सुविधा मिळतील असा विश्वास शेखावत यांनी व्यक्त केला. समाजात समता, बंधुता आणि सदाचार यांचं बीज रोवण्याचं काम निवृत्तिनाथांनी केल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. पर्यटन मंत्रालयानं प्रसाद योजनेअंतर्गत निवृत्ती महाराज आश्रम परिसरात ही इमारत बांधली आहे.

**<u>सोलापूर मनपा</u>**

सोलापूर महानगरपालिकेसाठी भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी नरेंद्र काळे यांची निवड करण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेत भाजपाचे ८७ नगरसेवक निवडून आले आहेत.

**<u>निवडणूक</u>**

कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर काल जिल्हाधिकाऱ्यांनी राधानगरी, भुदरगड, आजरा, चंदगड, गडहिंग्लज आणि कागल तालुक्यांचा दौरा करुन निवडणूक यंत्रणेचा आढावा घेतला. निवडणूक काळात कोणत्याही प्रकारची अनियमितता राहू नये अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**<u>ग्रामीणसासं</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात लांजा तालुक्यातल्या रिंगणे गावात आयोजित ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कोनकर यांच्या हस्ते झालं. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर या संमेलनाचे अध्यक्ष आहेत. बदललेल्या कोकणाचं वास्तव असलेल्या ग्रामीण साहित्याची आज गरज आहे असं मत केतकर यांनी यावेळी व्यक्त केलं. एके काळी मुंबईतून येणाऱ्या मनिऑर्डरवर कोकणाची उपजीविका चालत असे. आता चित्र नेमकं उलट झालं आहे. कोकणातल्या जमिनी, जागा विकून मिळणारे पैसे मुंबईकरांना पुरवले जात आहेत. हे मुंबईचं आणि कोकणाचं बदललेलं वास्तव आहे, असं ते म्हणाले.

**<u>निवृत्ती</u>**

आकाशवाणी पुणे केंद्रातील वरीष्ठ अभियांत्रिकी सहायक अब्दुलरझाक हेब्बाळकर काल सेवानिवृत्त झाले. त्यांनी आकाशवाणीच्या पणजी, आहवा, उस्मानाबाद आणि पुणे केंद्राच्या अभियांत्रिकी विभागात काम केलं. यानिमित्ताने झालेल्या निरोप समारंभात निवृत्त मुख्य अभियंता सुनील अरोरा यांनी हेब्बाळकरांना निवृत्तीपश्चात जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

**क्रीडामहोत्सव**

भंडारा जिल्हा परिषदेतर्फे आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवाचं उद्घाटन काल पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते झालं. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे आणि शाळांचा दर्जा उंचावण्याचे खरे काम शिक्षकच करतात असं मत भोयर यांनी यावेळी व्यक्त केलं

**क्रीडास्पर्धा**

पालघर जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी आयोजित क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन काल झालं. जिल्हा परिषद मुख्यालय आणि मोखाडा तालुका यांच्यातील कबड्डीच्या सामन्यानं स्पर्धेला प्रारंभ झाला.

**बॅडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू देविका सिहाग हिनं थायलंड मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. कालच्या उपांत्य सामन्यात देविकानं चायनीज तैपेईच्या हुआंग यू सुन हिचा 22-20, 21-13 अशा सरळ गेम्समध्ये पराभव केला.

**टेनिस**

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेतलं महिला एकेरीचं विजेतेपद एलेना रिबाकिना हिला मिळालं आहे. काल झालेल्या अंतिम फेरीच्या सामान्यात तिनं आर्यना सबालेन्कावर 6-4, 4-6, 6-4 अशा सेटसमध्ये विजय मिळवला. पुरुष एकेरीचा अंतिम सामना आज नोवाक जोकोविच आणि कार्लोस अल्कराझ यांच्यात होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील वीस षटकांच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा 46 धावांनी पराभव करत ही मालिका 4-1 अशी जिंकली. प्रथम फलंदाजी करत भारताने 271 धावा केल्या. इशान किशनने 43 चेंडूत 103 तर कर्णधार सूर्यकुमार यादवने 63 धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंडचा संघ 225 धावांवर संपला. सलामीवीर फिन ॲलनने 38 चेंडूंत 80 धावांची खेळी केली. भारताकडून अर्शदीप सिंगने पाच बळी घेतले, तर अक्षर पटेलने तीन बळी मिळवले. इशान किशनला सामनावीर तर सूर्यकुमार यादवला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**हवामान-**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या,**

**१. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी घेतली राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.**
**२. कर्तव्यभावनेनं जबाबदारी स्वीकारत असल्याचं सुनेत्रा पवार यांचं निवेदन.**
**३. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रिय अर्थसंकल्प सादर करणार.**
**४. वकीलांसाठीच्या देशातल्या पहिल्या प्रशिक्षण आणि संशोधन केंद्राचं लोकार्पण.**
**५. नमामी मुळा-मुठा योजना आखून नदी सुधार प्रकल्पाअंतर्गत प्रदूषणावर ठोस उपाययोजना करणार असल्याची केंद्रिय जलशक्ती राज्यमंत्र्यांनी दिली माहिती.**
**आणि**
**६. न्यूझीलंडविरुद्धची वीस षटकांची क्रिकेट मालिका भारताने 4-1 अशी जिंकली.**

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.